मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड लोडशेडिंगमुक्त करण्यासाठी आमदार शंकर जगताप यांचा "मास्टर प्लॅन"

## महावितरणच्या 'प्रकाश भवन' कार्यालयामध्ये शहरातील वीज प्रश्नांवर महत्वपूर्ण बैठक, पिंपरी-चिंचवडसह राजगुरुनगर, लोणावळ्यासाठी नवीन परिमंडळ



**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, ग्राहकसंख्या आणि विजेची मागणी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवडची वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी चिंचवड विधानसभा क्षेत्राचे आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. वीज विषयक प्रलंबित कामांना गती देण्यासाठी आयोजित बैठकीत त्यांनी महापारेषण आणि महावितरणला कालबद्ध, परिणामकारक आणि भविष्यवेधी नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. पिंपरी चिंचवड मतदारसंघनिहाय वीज वितरण सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समित्यांमार्फत स्थानिक वीजसमस्यांचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. महत्वाचे म्हणजे पिंपरी चिंचवड राजगुरुनगर, लोणावळासह नवीन परिमंडळाचा प्रस्ताव ठेवण्यात आला असून, यामुळे शहराला स्वतंत्र वीज परिमंडळ मिळून प्रशासकीय कामांना मोठी गती मिळणार आहे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे जलद गतीने निवारण होण्यास मदत होणार आहे.

मुख्य म्हणजे पुढील सहा महिन्यांत पाषाण–सांगवी वीजवाहिनी, यशदा परिसरात नवीन वीज उपकेंद्र, पिंपरी-चिंचवड शहरासाठी आवश्यक नवीन वीज उपकेंद्रे आणि सबस्टेशनचा सविस्तर प्रकल्प अहवाल, गहुंजे येथील प्रस्तावित २२०/२२ केव्ही, ३०० एमव्हीए क्षमतेच्या अतिउच्चदाब उपकेंद्राच्या प्रस्तावाला गती देण्याबाबत चर्चा झाली. अधिकाऱ्यांनी कोणती कामे पूर्ण करायची, प्रत्येक कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रस्ताव मुख्य कार्यालयाकडे कधी पाठविणार आणि मंजुरीपासून निविदा प्रक्रियेपर्यंत किती कालावधी लागणार, याचे निश्चित वेळापत्रक तयार करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. केवळ प्रस्ताव तयार करून न थांबता दर महिन्याला उद्दिष्ट निश्चित करून प्रत्यक्ष प्रगतीचा आढावा घेण्यावर भर द्या असे स्पष्ट निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

महावितरण 'प्रकाश भवन' कार्यालयामध्ये (दि ३१) रोजी ही बैठक पार पडली. बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड शहराच्या सुनियोजित व्यवस्थित आणि सक्षम वीज पुरवठ्यासाठी आक्रमकभूमिकाघेतली.यावेळी मुख्य अभियंता (महापारेषण) अनिल भारसाकळे,अधीक्षक अभियंता (महापारेषण) व्ही. डी. भुजबळ , अधीक्षक अभियंता (महापारेषण) जे. एम. कोकाटे, अधीक्षक अभियंता (सिव्हिल) पी. एच. काकडे , कार्यकारी अभियंता (पिंपरी) एस. एस. मुंडे, सहाय्यक कार्यकारी अभियंता (सांगवी) के. एस. गिरी, कार्यकारी अभियंता (भोसरी) व्ही. एस. लहाने, उपविभागीय अधिकारी (हिंजवडी) एस. बी. पाटील, उपविभागीय अधिकारी (खराळवाडी) डी. बी. तरंगे आदी उपस्थित होते.

या बैठकीत पाषाण–सांगवी वीजवाहिनीचे काम सहा महिन्यांत सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे सांगवी परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम आणि सुरळीत होण्यास मदत होईल.यशदा परिसरात नवीन वीज उपकेंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागेच्या प्रस्तावाचा तातडीने पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सन २०५१ मधील संभाव्य लोकसंख्या विचारात घेऊन पिंपरी-चिंचवड शहरासाठी आवश्यक नवीन वीज उपकेंद्रे आणि सबस्टेशनचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. सांगवी, नवी सांगवी, रावेत यासारख्या भागात पावसाळ्यात पूरप्रवण आणि सखल भागातील डीपी, ट्रान्सफॉर्मर व इतर वीजयंत्रणा पाण्यातजाण्याच्याघटनालक्षात घेऊन त्या सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. भविष्यात पूरस्थिती निर्माण झाल्यास वीजपुरवठा खंडित होऊ नये. रावेत परिसरातील दुसरा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित (चार्ज) करण्यात आल्यामुळे विशेषतः उन्हाळ्यातील भारनियमन आणि वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.गहुंजे येथील प्रस्तावित २२०/२२ केव्ही, ३०० एमव्हीए क्षमतेच्या अतिउच्चदाब उपकेंद्राच्या प्रस्तावाला गती देण्याबाबत चर्चा झाली. १३ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय बैठकीत प्रस्तावाला तातडीने मंजुरी मिळावी, यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. रावेत, पुनावळे, किवळे आणि ताथवडे या वेगाने विकसित होणाऱ्या भागांतील भविष्यातील विजेची मागणी विचारात घेऊन ट्रान्सफॉर्मर, केबल आणि RMU यांसारख्या पायाभूत सुविधांचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मतदारसंघनिहाय वीज वितरण सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समित्यांमार्फत स्थानिक वीजसमस्यांचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. रस्ते खोदाईमुळे भूमिगत वीजवाहिन्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी महावितरण, महापारेषण आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेची संयुक्त समिती स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. फिडर आणि RMU वर अनधिकृत जाहिराती लावण्यास प्रतिबंध करण्यात यावा. नियमांचे उल्लंघन करून जाहिराती लावणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यासह कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. उघड्यावरील ट्रान्सफॉर्मर आणि फिडर पिलरभोवती किमान सात फूट उंच संरक्षक जाळी बसवून आवश्यक विद्युत सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. जुन्या आणि धोकादायक वीजयंत्रणेबाबत मेंटेनन्स टीमने अहवाल तयार करून कमीत कमी वेळेत दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत, जेणेकरून वीजपुरवठा सुरळीत राहील. नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी नियमित ग्राहक मेळावे आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

> **"पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने होणारा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता अखंडित, सक्षम आणि अखंड वीजपुरवठा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. विजेच्या वाढत्या मागणीचा विचार करून भविष्यातील गरजांनुसार वीजयंत्रणेची क्षमता वाढवणे, नवीन सबस्टेशन उभारणे आणि प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावणे याला माझे सर्वोच्च प्राधान्य आहे. महापारेषण आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांनी केवळ प्रस्तावांवर न थांबता दरमहा उद्दिष्टे निश्चित करून कामाचा प्रत्यक्ष वेग वाढवावा. पीसीएमसी आणि पीएमआरडीएच्या समन्वयाने एकात्मिक नियोजन करून शहर पूर्णपणे लोडशेडिंगमुक्त करण्यासाठी कालबद्ध रीतीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत." महत्वाचे म्हणजे पिंपरी चिंचवड राजगुरुनगर, लोणावळासह नवीन परिमंडळाचा प्रस्ताव ठेवण्यात आला असून, यामुळे शहराला स्वतंत्र वीज परिमंडळ मिळून प्रशासकीय कामांना मोठी गती मिळणार आहे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे जलद गतीने निवारण होण्यास मदत होणार आहे..**
>
> **- शंकर जगताप , आमदार , चिंचवड विधानसभा .**

# पिंपरी-चिंचवड शहरातील पर्यटन केंद्र अप्पूघरचा लवकरच कायापालट

## निगडी येथील अप्पूघरचा (स्व. इंदिरा गांधी उद्यान) आता 18 कोटी 60 लाख रूपयांच्या गुंतवणुकीतून संपूर्ण कायापालट केला जाणार आहे.,

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या निगडी येथील स्वर्गीय इंदिरा गांधी उद्यानातील अप्पूघर आता नव्या व अत्याधुनिक रूपात पाहायला मिळणार आहे. १८ कोटी ६० लाखांच्या खासगी गुंतवणुकीतून या उद्यानाचा कायापालट करण्यात येणार आहे.

महापालिकेचे शहरातील सर्वात जुने मनोरंजनालय म्हणून अप्पूघरची ओळख आहे. काळाच्या ओघात येथील बहुतांशी खेळणी जुनी झाली आहेत. जुन्या आणि जीर्ण झालेली यंत्रसामग्री व खेळणीमुळे नवी पिढी याकडे आकर्षित होत नसल्याने पर्यटकांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. त्याचा थेट परिणाम महसुलावर होत होता. नव्या पर्यटन स्थळांशी स्पर्धा करणे कठीण झाल्यामुळे अप्पूघरचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

अप्पूघरच्या ठेकेदाराकडून १८ कोटी ६० लाख रुपयांची येथे गुंतवणूक केली जाणार आहे. तेथे पाण्यावरील घसरगुंडी, फ्लॉइंग सिनेमा, ३६० अंशातील इमर्सिव्ह डोम, हॉरर हाऊस, मिरर मेझ व इन्फिनिटी टनल, नायगारा कृत्रिम धबधबा, किड्स ट्रॅफिक पार्क, आर्केड गेम्स, एआर-व्हीआर झोन आणि इंटरॅक्टिव्ह सेल्फी झोन यांसारख्या अत्याधुनिक व थरारक राईड्सची भर पडणार आहे. नेचर व किड्स थीमवर उद्यानात सुशोभीकरण केले जाणार आहे.

डिजिटल तिकीट प्रणाली, स्मार्ट वाहनतळ, आधुनिक फूड कोर्ट, पिण्याचे पाणी, अग्निसुरक्षा, सीसीटीव्ही कॅमेरे, आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध असणार आहे. अत्याधुनिकरण १८ महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. अप्पूघर पुढील १५ वर्षांसाठी ठेकेदाराला देण्यास उपसूचनेसह स्थायी समितीने मान्यता दिली.

वाढते शहरीकरण, झपाट्याने होणारे नागरीकरण आणि लोकसंख्येच्या तुलनेत निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने नवीन शौचालय धोरण तयार करण्यात आले आहे. शौचालयांची सद्यःस्थिती, उपलब्ध सुविधा, लोकसंख्येच्या तुलनेत आवश्यक शौचालयांची संख्या, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, वाहतूक केंद्र, उद्याने, धार्मिक स्थळे, झोपडपट्टी व दाट लोकवस्तीचे भाग, प्रमुख रस्ते व इतर गर्दीच्या ठिकाणांचा विचार करून तयार करण्यात आलेल्या नवीन धोरणालाही मान्यता देण्यात आली.

अप्पूघरचे अत्याधुनिकरण १८ महिन्यांत पूर्ण केले जाणार आहे. पहिल्यावर्षी दहा टक्के आणि त्यानंतर दरवर्षी पाच टक्के वार्षिक भाडेवाढ महापालिकेला मिळणार आहे. शहराच्या पर्यटन क्षेत्रामध्ये भर पडणार असून, स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी व्यक्त केला.




### महापालिकेला वाढता महसूल, रोजगारालाही चालना

**» स्थायी समितीने अप्पूघर पुढील १५ वर्षांसाठी ठेकेदाराकडे चालविण्यास मंजुरी दिली आहे. करारानुसार पहिल्या वर्षी महापालिकेला १० टक्के आणि त्यानंतर दरवर्षी ५ टक्के वार्षिक भाडेवाढ मिळणार आहे. या प्रकल्पामुळे पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होतील. आधुनिक मनोरंजन सुविधांमुळे अप्पूघरची ओळख पुन्हा प्रस्थापित होईल आणि पिंपरी-चिंचवडच्या पर्यटन नकाशावर हे केंद्र अधिक प्रभावीपणे झळकणार असल्याचा विश्वास स्थायी समितीने व्यक्त केला.**

### १८ महिन्यांत पूर्ण होणार प्रकल्प

**» अप्पूघरचे अत्याधुनिकीकरण पुढील १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पात डिजिटल तिकीट प्रणाली, स्मार्ट पार्किंग, आधुनिक फूड कोर्ट, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, अग्निसुरक्षा यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे आणि आपत्कालीन सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. पर्यटकांचा अनुभव अधिक सुरक्षित, सुलभ आणि दर्जेदार करण्यावर भर दिला जाणार आहे. शहरातील सर्वात जुने मनोरंजन उद्यान नव्या स्वरूपात विकसित होऊन पर्यटकांसाठी अधिक आकर्षक ठरण्याची अपेक्षा आहे.**

### अप्पूघरमध्ये येणार अत्याधुनिक आकर्षणे

**» निगडीतील अप्पूघरचे १८ कोटी ६० लाख रुपयांच्या खासगी गुंतवणुकीतून अत्याधुनिक रूपांतर करण्यात येणार आहे. पाण्यावरील घसरगुंडी, फ्लाइंग सिनेमा, ३६० अंशांचा इमर्सिव्ह डोम, हॉरर हाऊस, मिरर मेझ व इन्फिनिटी टनल, कृत्रिम नायगारा धबधबा, किड्स ट्रॅफिक पार्क, आर्केड गेम्स, एआर-व्हीआर झोन आणि इंटरॅक्टिव्ह सेल्फी झोन यांसारखी नवी आकर्षणे उभारली जाणार आहेत. नेचर आणि किड्स थीमवर उद्यानाचे सुशोभीकरण करून अप्पूघरला आधुनिक पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.**

# अमली पदार्थांविरोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांची मोठी मोहीम; 45 हजार नागरिकांमध्ये जनजागृती

## संशयास्पद हालचाली,अमली पदार्थांबाबत माहिती मिळाल्यास ती तातडीने पोलिसांना कळवावी, असे आवाहन पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने केले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

अमली पदार्थांचे वाढते संकट रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा असून, संशयास्पद हालचाली अथवा अमली पदार्थांबाबत माहिती मिळाल्यास ती तातडीने पोलिसांना कळवावी, असे आवाहन पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने केले आहे.

अमली पदार्थमुक्त पिंपरी-चिंचवड मोहिमेअंतर्गत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' (ट्विटर) वर आयोजित करण्यात आलेल्या व्हर्च्युअल टाउन हॉल उपक्रमातून सुमारे ४५ हजार नागरिकांमध्ये अमली पदार्थविरोधात जनजागृती करण्यात आली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'अमली पदार्थमुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेच्या अनुषंगाने पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. मंगळवारी (दि. २८) सकाळी ११ ते ११.३० या वेळेत 'एक्स' च्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधण्यात आला.

या उपक्रमात पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालये, औद्योगिक समूह, गृहनिर्माण सोसायट्या, डॉक्टर व मेडिकल असोसिएशन, हॉटेल व्यावसायिक, स्वयंसेवी संस्था आणि सार्वजनिक मंडळे अशा एकूण ५८१ समूहांतील विद्यार्थी, नागरिक व कर्मचारी सहभागी झाले होते.

अमली पदार्थांचे दुष्परिणाम, व्यसनापासून बचावाचे उपाय, संशयास्पद हालचाली आढळल्यास काय करावे आणि तक्रार कशी द्यावी, याबाबत नागरिकांनी प्रश्न विचारले. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे देत अमली पदार्थविरोधातील लढ्यात नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

या वेळी अँटी नार्कोटिक्स हेल्पलाईन क्रमांक ७७९८१००११२ सुरू करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. अमली पदार्थांची विक्री, साठा किंवा सेवनाबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी या हेल्पलाईनवर संपर्क साधून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमात पोलिस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलिस आयुक्त सारंग आवाड तसेच सर्व पोलिस उपायुक्त, सहाय्यक पोलिस आयुक्त आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक सहभागी झाले होते. उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# महापालिकेची 14 कोटींच्या डांबर खरेदीला मंजुरी

**येरवडा येथील नवीन अत्याधुनिक 'हॉटमिक्स प्लँट' पूर्ण क्षमतेने सुरु होणार; 15 क्षेत्रीय कार्यालयांना मिळणार डांबरी मिश्रण.**

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, डांबरीकरण आणि रस्त्यांच्या देखभाल- दुरुस्तीच्या कामांना वेग देण्यासाठी येरवडा येथील महापालिकेच्या हॉटमिक्स प्लँटसाठी सुमारे १४ कोटी रुपयांच्या पेट्रोलियमजन्य साहित्य खरेदीच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. परिणामी येरवडा येथे उभारलेला नवीन हॉटमिक्स प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करण्यास गती मिळणार आहे.

या प्रकल्पाची क्षमता प्रतितास १६० टन हॉटमिक्स तयार करण्याची आहे. परिणामी गेल्या दोन महिन्यांपासून रखडलेल्या पावसाळ्यातील रस्ते दुरुस्तीच्या कामाला गती येणार असल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. येरवडा येथील महापालिकेचा बॅच मिक्स (हॉटमिक्स) प्लँट शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालये आणि मुख्य पथ विभागाला दररोज डांबरी मिश्रणाचा पुरवठा करतो.

या मिश्रणाचा वापर खड्डे बुजविण्यासाठी, रस्त्यांची देखभाल- दुरुस्ती, तसेच रिसर्फेसिंगसाठी केला जातो. प्लँट वर्षभर दोन शिफ्टमध्ये सुरू ठेवण्यासाठी डांबर, एलडीओ, इमल्शन, रोडबॉन्ड (कोल्डमिक्स) आणि थर्मिक ऑइलचा सातत्याने पुरवठा आवश्यक असल्याचे प्रशासनाने प्रस्तावात नमूद केले होते.

महापालिका प्रशासनाने यापूर्वी २०२३ मध्ये या साहित्याच्या खरेदीसाठी सुमारे १४.२९ कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया राबवली होती.

त्यानंतर २७ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या स्थायी समितीच्या ठरावानुसार अधिनियमातील विशेष तरतुदीचा वापर करून उत्पादक कंपन्यांकडून थेट खरेदी करण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यात आले होते. त्याच पद्धतीने पुढील दोन महिन्यांसाठी आवश्यक साहित्य थेट उत्पादकांकडून खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

दरम्यान, येरवडा हॉटमिक्स प्लँटमध्ये पार्कर कंपनीचा नवीन बॅच मिक्स प्लँट कार्यान्वित करण्यात येत असून, त्यासाठी आवश्यक थर्मिक ऑइलची प्रथमच खरेदी करण्यात येणार आहे. डांबरी मिश्रण आवश्यक तापमानात ठेवण्यासाठी आणि यंत्रणा सुरळीत चालविण्यासाठी थर्मिक ऑइल आवश्यक असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.



### प्रतितास 160 टन हॉटमिक्स तयार करण्याची क्षमता

» येरवडा येथे उभारण्यात आलेल्या नवीन बॅच मिक्स (हॉटमिक्स) प्लँटची क्षमता प्रतितास १६० टन डांबरी मिश्रण तयार करण्याची आहे. हा प्लँट शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालये आणि मुख्य पथ विभागाला आवश्यक डांबरी मिश्रणाचा पुरवठा करणार आहे. या मिश्रणाचा वापर खड्डे बुजविणे, रस्त्यांची देखभाल-दुरुस्ती आणि रिसर्फेसिंगसाठी केला जाणार आहे. पावसाळ्यात रखडलेल्या रस्ते दुरुस्तीच्या कामांना यामुळे मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### 14 कोटींच्या साहित्य खरेदीला मंजुरी

» येरवडा येथील महापालिकेच्या हॉटमिक्स प्लँटसाठी सुमारे १४ कोटी रुपयांच्या पेट्रोलियमजन्य साहित्य खरेदीच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. या निधीतून डांबर, एलडीओ, इमल्शन, रोडबॉन्ड (कोल्डमिक्स) आणि थर्मिक ऑइलची खरेदी केली जाणार आहे. शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, डांबरीकरण आणि देखभाल-दुरुस्तीची कामे अधिक वेगाने करण्यासाठी हा निर्णय महत्वाचा मानला जात आहे. आवश्यक साहित्याचा अखंड पुरवठा झाल्याने हॉटमिक्स प्लँट वर्षभर नियमितपणे सुरू ठेवणे शक्य होणार आहे.

### प्रथमच थर्मिक ऑइलची खरेदी

» येरवडा हॉटमिक्स प्लँटमध्ये पार्कर कंपनीचा अत्याधुनिक बॅच मिक्स प्लँट कार्यान्वित करण्यात येत असून, त्यासाठी प्रथमच थर्मिक ऑइलची खरेदी करण्यात येणार आहे. डांबरी मिश्रण आवश्यक तापमानात ठेवण्यासाठी तसेच यंत्रणा सुरळीत चालविण्यासाठी थर्मिक ऑइल आवश्यक असते. यापूर्वी २०२५ मध्ये स्थायी समितीने उत्पादक कंपन्यांकडून थेट साहित्य खरेदीचे अधिकार आयुक्तांना दिले होते. त्याच पद्धतीने पुढील दोन महिन्यांसाठी आवश्यक साहित्य थेट उत्पादकांकडून खरेदी करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

# मराठी साहित्य संमेलनासाठी तिजोरी उघडली; उदय सामंत यांची 5 कोटींच्या निधीची घोषणा

**12 देशांमध्ये संमेलन आणि 13 विद्यापीठांमध्ये युवा साहित्य संमेलनाचे आयोजन; सीएसआर आणि सरकारी निधीतून आर्थिक मदत.**

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पाच कोटी रुपये आणि त्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रात होणाऱ्या विविध संमेलनांसाठी मिळून सुमारे १७ कोटी रुपये देण्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी केली. महाराष्ट्र साहित्य परिषदेत संमेलनासंदर्भातील बैठकीला सामंत उपस्थित होते.




मागील वर्षी कबूल केल्याप्रमाणे मसापच्या परिसर संवर्धनासाठी एक कोटी रुपयांचा धनादेश त्यांनी अध्यक्ष योगेश सोमण यांच्याकडे सुपूर्त केला. या वेळी मसापचे अध्यक्ष योगेश सोमण, समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती म्हाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, स्थानिक कार्यवाह सुनील महाजन आणि मराठी भाषा विभागाचे संचालक शामकांत देवरे उपस्थित होते.

हे संमेलन १०० वे असल्याने १२ देशांमध्ये संमेलन करण्यात येणार असून, त्यासाठी सीएसआर मधून दोन कोटी रुपये, युवकांसाठी राज्यातील १३ विद्यापीठांमध्ये साहित्य संमेलन करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येकी २५ लाख रुपये असा चार कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. याशिवाय विविध घटकांची ९९ साहित्य संमेलने भरवण्यात येणार आहेत, असे सामंत यांनी सांगितले

मराठी भाषा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध स्तरांवर समन्वय साधण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी सल्लागार समितीप्रमाणेच सचिवस्तरीय बैठका नियमितपणे घेतल्या जात आहेत. दरम्यान, संमेलन हे मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी असून, त्याला वादाचे स्वरूप देणे योग्य नसल्याचे मत सामंत म्हणाले.

### मराठी उत्कृष्टता केंद्र पुण्यात

» मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर स्थापन होणारे मराठी उत्कृष्टता केंद्र हे केंद्र सरकारच्या निधीची वाट न पाहता राज्य सरकारच्या निधीतून उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली हे केंद्र पुण्यात स्थापन करण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडून निधीला अनेक वर्षांचा कालावधी लागतो, हे लक्षात घेऊन राज्य सरकारने स्वतःच्या निधीतून हे केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला असून, याची सुरुवात पुढील पाच ते सहा महिन्यांत करणार असल्याचे सामंत म्हणाले.

# मुळा-मुठेतील प्रदूषण धोकादायक पातळीवर घातक जिवाणू असल्याचे उघडकीस!

## पाण्यात कर्करोगास कारणीभूत ठरणारे जड धातू आणि बहुऔषध प्रतिरोधक घातक जिवाणू आढळले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील मुळा-मुठा नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि वैद्यकीय टाकाऊ पदार्थ मिसळल्यामुळे नदीतील प्रदूषण अत्यंत धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. नदीच्या पाण्यात मानवी आरोग्यास अत्यंत घातक ठरणारे जड धातू आणि बहुऔषध प्रतिरोधक जिवाणू (मल्टिड्रग रेझिस्टन्ट बॅक्टेरिया) मोठ्या प्रमाणात आढळले असून, म्हात्रे पूल आणि संगम पूल या ठिकाणी प्रदूषणाची तीव्रता सर्वाधिक नोंदवली गेली.

गणेशखिंड येथील मॉडर्न कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातील संशोधक डॉ. विनय कुमार यांच्या नेतृत्वाखालील संशोधक पथकाने या बाबतचे संशोधन केले. संशोधन पथकात कवलजित कौर, प्रमोद बारहे, सागर रेड्डी यांचा समावेश होता. या संशोधनाचा शोधनिबंध 'टॉक्सिकोलॉजी अँड एन्व्हॉर्न्मेंटल हेल्थ सायन्स' या संशोधनपत्रिकेत नुकताच प्रसिद्ध झाला आहे.



### सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुधारण्याची गरज

» मुळा-मुठा नदीचे पाणी शेती आणि दैनंदिन कामांसाठीही वापरले जात असल्याने हे घातक जिवाणू आणि विषारी जड धातू थेट अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. त्यामुळे नदीत सांडपाणी, रसायने सोडणे पूर्णपणे थांबवणे, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची कार्यक्षमता तातडीने सुधारणे अत्यंत गरजेचे आहे, असा इशारा संशोधकांनी दिला आहे.

संशोधनासाठी केंद्र सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या बिल्डर प्रकल्पाअंतर्गत निधी प्राप्त झाला होता.

संशोधनासाठी नदीतून गोळा केलेल्या जिवाणूंच्या नमुन्यांमध्ये क्लेब्सिएला न्यूमोनिया आणि एंटेरोबॅक्टेरियासीस कुळातील घातक जिवाणू आढळून आले आहेत. त्यातील ७५ टक्क्यांपेक्षा जास्त जिवाणू बहुऔषधरोधी असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे जिवाणू सेफॅलोस्पोरिन, पेनिसिलिन, फ्लूरोक्विनोलोन्स आणि अगदी शेवटचा पर्याय मानल्या जाणाऱ्या कार्बपेनेम श्रेणीतील प्रतिरोधकांनाही दाद देत नाहीत. तसेच, सुमारे ७३ टक्क्यांपेक्षा जिवाणूंमध्ये 'बायोफिल्म' तयार करण्याची क्षमता आढळली. त्यामुळे प्रतिरोधकांचा प्रभाव पूर्णपणे नाहीसा होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

नदीच्या पाण्यात जस्त, शिसे, तांबे, कॅडमियम, कोबाल्ट, आर्सेनिक आणि क्रोमियम यांसारख्या अत्यंत विषारी जड धातूंचे प्रमाण जागतिक आरोग्य संघटना आणि भारतीय मानकांपेक्षा खूप जास्त आढळले. म्हात्रे पूल आणि संगम पूल या ठिकाणी या प्रदूषणाची सर्वाधिक तीव्रता नोंदवली गेली. अभ्यासातील सांख्यिकीय विश्लेषणातून 'को-सिलेक्शन'ची गंभीर बाब आढळून आली. त्यानुसार पाण्यात जड धातूंचे प्रमाण जितके जास्त, तितकी जिवाणूंमध्ये प्रतिरोधकांचा प्रतिकार करण्याची क्षमता वाढत असल्याचे दिसून आले. जड धातूंच्या सततच्या संपर्कामुळे प्रतिरोधके आणि धातू यांचा एकाच वेळी सामना करण्यासाठी जिवाणू सक्षम होतात, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुळा-मुठा नदीचे पाणी शेती आणि दैनंदिन कामांसाठीही वापरले जात असल्याने हे घातक जिवाणू आणि विषारी जड धातू थेट अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. त्यामुळे नदीत सांडपाणी, रसायने सोडणे पूर्णपणे थांबवणे, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची कार्यक्षमता तातडीने सुधारणे अत्यंत गरजेचे आहे, असा इशारा संशोधकांनी दिला आहे.

### मानवी आरोग्याला धोका

» मूल्यांकनानुसार या दूषित पाण्याचा थेट संपर्क किंवा वापर झाल्यास कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा मोठा धोका निर्माण झाला आहे. प्रौढांच्या तुलनेत लहान मुलांना या प्रदूषणाचा सर्वाधिक फटका बसत असल्याचे अभ्यासात स्पष्ट झाले.

> नदी स्वच्छ राहण्यासाठी तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे. उपाययोजना करण्यासाठी वस्तुस्थिती नेमकेपणाने समजणे महत्त्वाचे असते. त्यासाठी संशोधनातून प्रशासन आणि समाजाला दिशा मिळू शकते.
>
> \- डॉ. विनय कुमार, संशोधक


# खडकवासला धरणातून 22,880 क्युसेकने विसर्ग; नदीकाठच्या नागरिकांना अलर्ट

## बँकेच्या ग्राहकांची मोठी गैरसोय होत असून पैसे काढण्यास असंख्य अडथळे निर्माण होत आहेत.आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणाच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत असून पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे धरणातून मुठा नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात मोठी वाढ करण्यात आली आहे.

खडकवासला पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, (३१ जुलै २०२६) दुपारी १२ वाजता धरणाच्या सांडव्यावरून नदीपात्रात सोडला जाणारा विसर्ग १६,२४७ क्युसेकने वाढवून एकूण २२,८८० क्युसेक करण्यात येणार आहे.



विभागाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत सांगितले आहे की, पावसाचे प्रमाण आणि धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकनुसार विसर्गात पुन्हा वाढ किंवा घट होऊ शकते. त्यामुळे मुठा नदीकाठच्या तसेच सखल भागातील नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी.

प्रशासनाने नागरिकांना नदीपात्रात न उतरण्याचे आवाहन केले असून नदीपात्रातील साहित्य, वाहने किंवा जनावरे तातडीने सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच संबंधित यंत्रणांनी सखल भागातील नागरिकांना सतर्क करून आवश्यक ती उपाययोजना करावी, असे आवाहन कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग यांनी केले आहे.

### प्रशासनाच्या यंत्रणा सज्ज

» खडकवासला पाटबंधारे विभागाने संबंधित प्रशासकीय यंत्रणा, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना सखल भागातील नागरिकांना सतर्क करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पावसाचे प्रमाण आणि धरणात होणारी पाण्याची आवक यावर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून परिस्थितीनुसार विसर्गात बदल केला जाणार आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचना पाळाव्यात आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने नदीपात्रापासून दूर राहावे, असे आवाहन कार्यकारी अभियंत्यांनी केले आहे.